31 JUL 20

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्यादेवींचे चिकित्सकपणे देश उभारणीत योगदान

## डॉ. प्रकाश पवार यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रागतिक, सुधारणावादी व चिकित्सक दृष्टिकोनातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी राजकारण व समाजकारणाला विशेष आकार दिला. देश उभारणीसाठी प्रयत्न करीत असताना शेतकऱ्यांना शेतीमध्ये व स्त्रियांना वस्त्रोद्योगामध्ये प्रोत्साहन देऊन स्वदेशीची काळजी वाहिली. पुढे तोच उद्योग जगभर विकसित झाला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. प्रकाश पवार. सोबत डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, बबन रानगे.**

अहिल्यादेवी होळकर अध्यासनाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त इतिहास अधिविभागाच्या सभागृहामध्ये 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. पवार म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे प्रशासनावर चांगले नियंत्रण होते. समाजोपयोगी कामासाठी लागणारा पैसा हा त्यांनी कधीच कर रूपाने गोळा केला नाही. सरकारचा पैसा खासगीकडे खर्च न करण्याचा आदर्श वस्तुपाठ अहिल्यादेवींनी घालून दिला.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांचेही अध्यक्षीय भाषण झाले. डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता राजमाने यांनी सूत्रसंचालन केले. दत्ता टिपुगडे यांनी आभार मानले. यावेळी बबनराव रानगे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JUL 2024

सकाळ

# अहिल्यादेवींकडून प्रागतिक, सुधारणावादी राजकारण : डॉ. पवार



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना डॉ. प्रकाश पवार. यावेळी डावीकडून डॉ. मच्छिंद्र गोफणे, श्रीकृष्ण महाजन, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, बबनराव रानगे.

कोल्हापूर, ता. ३० : 'प्रागतिक, सुधारणावादी आणि चिकित्सक दृष्टिकोनातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी राजकारण आणि समाजकारणाला विशेष आकार दिला. देश उभारणीसाठी प्रयत्न करताना शेतकऱ्यांना शेतीमध्ये आणि स्त्रियांना वस्त्रोद्योगामध्ये प्रोत्साहन देऊन रयतेची काळजी वाहिली. पुढे तोच उद्योग जगभर विकसित झाला', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी आज येथे केले.

विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त इतिहास अधिविभागाच्या सभागृहामध्ये 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : जीवन आणि कार्य' या विषयावर चर्चासत्र झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना राजकारणाची जाणीव आयुष्याच्या पहिल्या पंचवीस वर्षांमध्येच झालेली होती. त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने अठराव्या शतकाला आकार देण्याचा प्रयत्न केला. अठरावे शतक होळकरांनी व्यापलेले आहे. अहिल्यादेवींनी लहानपणी चौंडीच्या परिसरातील पाटलांचे, त्यांच्या वडिलांचे राजकारण पाहिले आणि ते त्यांच्यासाठी खूप महत्त्वाचे ठरले. पुढील काळात त्यांनी उत्तर आणि पश्चिम हिंदुस्थानासह संपूर्ण हिंदुस्थानचे राजकारण पाहिले. त्यांच्या सासऱ्यांनी मुलगा आणि मुलगी यामध्ये भेदभाव करावयाचा नाही, हा दृष्टिकोन दिला. त्यामुळे अहिल्यादेवींनी सती जाण्याचा निर्णय नाकारून होळकरशाहीचे उदयास आलेले राजकारण सांभाळण्याचा निर्णय घेतला. एक महिला समाज, राजकारणाला आकार देऊ शकते, ही अहिल्यादेवींमुळे आलेली पहिली परंपरा आहे. महिला राजकारण करू शकते, हे भारतामध्ये या ठिकाणी पहिल्यांदाच घडले.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'तीनशे वर्षांपूर्वीच्या थोर व्यक्तींवर अपेक्षित संशोधन वा अभ्यास झालेला नाही. समकालीन ब्रिटिश लेखकांनी इतिहासलेखन केले नसते, तर अडचणी अधिकच वाढल्या असत्या. कोल्हापूर दप्तरामध्ये होळकरशाहीशी संबंधित अप्रकाशित इतिहास आहे. त्याचा अभ्यास व्हायला हवा.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JUL 2024

तरुण भारत



कोल्हापूर : अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. प्रकाश पवार. सोबत डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. डी. टी. शिर्के, बबनराव रानगे.

# अहिल्यादेवी होळकर यांचे देश उभारणीत मोठे योगदान

■ ज्येष्ठ विचारवंत डॉ.प्रकाश पवार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रागतिक, सुधारणावादी आणि चिकित्सक दृष्टीकोनातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी राजकारण आणि समाजकारणाला विशेष आकार दिला. शेतकऱ्यांना शेतीमध्ये आणि स्त्रियांना वस्त्रोद्योगामध्ये प्रोत्साहन देऊन रयतेची काळजी वाहिली. पुढे तोच उद्योग जगभर विकसित झाला. अहिल्यादेवी होळकर यांनी देश उभारणीसाठी मोठे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील अहिल्यादेवी होळकर अध्यासनाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त चर्चासत्राचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर: जीवन आणि कार्य' हा विषय होता. डॉ. पवार म्हणाले, एक महिला समाज, राजकारणाला आकार देवू शकते, ही अहिल्यादेवींमुळे आलेली पहिली परंपरा आहे. अहिल्यादेवींचे अखिल चरित्र संशोधकांना खुणावणारे आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आधुनिक संशोधकांनी वेध घेणे महत्त्वाचे आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोल्हापूर दफ्तरमध्ये होळकरशाहीशी संबंधित अप्रकाशित इतिहास आहे. त्याचा अभ्यास व्हायला हवा.

डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता राजमाने यांनी सूत्रसंचालन केले. दत्ता टिपूगडे यांनी आभार मानले. यावेळी बबनराव रानगे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. नीलांबरी जगताप, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.


31 JUL 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रवेश रद्द केल्यास शुल्क परत

## खासगी तसेच अभिमत विद्यापीठांना 'यूजीसी'चा चाप

■ रमेश पाटील : सकाळ वृत्तसेवा

म्हाकवे, ता. ३० : कोणत्याही विद्यार्थ्याने खासगी अथवा अभिमत विद्यापीठात प्रवेश घेऊन तो रद्द केल्यास कॉलेज, विद्यापीठाला त्याचे शैक्षणिक शुल्क परत करावे लागणार आहे. या निर्णयाने खासगी व अनुदानित सर्वच महाविद्यालयांच्या मनमानी कारभाराला युनिव्हर्सिटी ग्रँड कमिशन अर्थात 'यूजीसी'ने चाप लावला आहे. विद्यार्थ्याने ३० सप्टेंबरपर्यंत स्वत:हून



प्रवेश रद्द केल्यास त्याचे पूर्ण शैक्षणिक शुल्क परत द्यावे लागणार आहे.

२०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासून 'यूजीसी'चे हे निर्देश सर्वांनाच पाळावे लागणार आहेत. मुदत संपल्यानंतर प्रवेश रद्द केल्यास पूर्वी महाविद्यालय

> “ विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशित केल्यानुसार विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास त्याचे प्रवेश शुल्क व कागदपत्रे ठरलेल्या नियमानुसार परत देणे आवश्यकच आहे. असे न झाल्यास विद्यापीठाच्या किंवा यूजीसीच्या तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार करता येणार आहे. त्यामुळे संबंधित शैक्षणिक संस्थांवर कारवाई होऊ शकते.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

आणि विद्यापीठे विद्यार्थ्यांना भरलेले शुल्क परत देत नव्हती. परंतु आता त्या विद्यार्थ्याला इतरत्र त्याच्या इच्छेनुसार चांगल्या मेरिटनुसार इतर संस्थेत प्रवेश मिळत असेल आणि त्याने अगोदर शैक्षणिक शुल्क भरून प्रवेश घेतला असेल तर तो रद्द करून त्याला सर्व पैसे परत मिळणार आहेत. ११ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास प्रवेश प्रक्रिया शुल्काचे एक हजार रुपये वगळून उर्वरित रक्कम संस्थेने विद्यार्थ्यास द्यावी लागणार आहेत. सध्या सर्वच महाविद्यालये व विद्यापीठांच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अतिशय महत्त्वाचा आहे. यापूर्वी कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास संस्थांकडून शैक्षणिक शुल्क परत केले जात नव्हते. याबाबतच्या अनेक तक्रारी यूजीसीकडे आल्या होत्या; परंतु आता शैक्षणिक शुल्क परत करण्याचे धोरण अमलात आले आहे.

**प्रवेश शुल्क परतीचे चार टप्पे...**

- १५ दिवसांत प्रवेश रद्द केल्यास १०० टक्के रक्कम परत
- २५ दिवसांत रद्द केल्यास ९० टक्के
- ३० दिवसांत रद्द केल्यास ५० टक्के
- ३० दिवसांनंतर मात्र कोणतीही रक्कम विद्यार्थ्याला परत मिळणार नाही

31 JUL 202४
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अवकाश जाणून घेताना...

**चंद्र, तारे, निहारिका, आकाशगंगा असो की धूमकेतू; त्यांच्या संरचनेचे रहस्य 'अवकाश व चांद्रयान मोहीम-३' पोस्टर प्रदर्शनातून उलगडले जाणार आहे. लाखो किलोमीटर अंतरावरील अवकाश कसे असते, त्याचा अनुभव पोस्टरच्या माध्यमातून घेता येणार आहे. निमित्त असेल 'सकाळ'च्या ४४ व्या वर्धापन दिनाचे. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहातील कलामहर्षी बाबूराव पेंढारकर कलादालनात १ ते ३ ऑगस्ट दरम्यान या पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. 'सकाळ'च्या वर्धापनदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रातर्फे हे प्रदर्शन होत आहे.**

सूर्यमालेतील सूर्यापासून पृथ्वी हा अंतरानुक्रमे तिसरा ग्रह आहे. आकारमानाने तो पाचवा ठरतो. त्याला 'निळा ग्रह' म्हणूनही संबोधले जाते. पृथ्वीवरून अवकाशाकडे पाहिल्यास त्यापलीकडे काय असेल, याचे कुतूहल मनात दाटून येते. त्यामुळेच अवकाशाचे आकर्षण आजही कायम आहे. अवकाश संशोधनाच्या माध्यमातून हे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न सातत्याने होत असतो. शालेय विद्यार्थ्यांच्या मनात अवकाशाबद्दल अनंत प्रश्नांची मालिका दडलेली असते. चंद्र पृथ्वीपासून ३ लाख ८४ हजार ४०० किलोमीटर दूर आहे, तरी त्याच्यासोबत 'चांदोमामा' म्हणून नाते जोडले गेले आहे. ग्रह, उपग्रह, तारे, तारकापुंज, आकाशगंगा यांची उत्पत्ती कशी झाली असेल, त्यांची संरचना कशी असते, धूमकेतू म्हणजे काय? ते कसा प्रवास करतात? असे अनेक प्रश्न रुंजी घालत असतात. २० जुलै १९६९ ला अपोलो ११ यानातून आर्मस्ट्रॉंग व ऑल्ड्रिन यांनी चंद्रावर पहिल्यांदा पाऊल ठेवले. साऱ्या जगाचे कुतूहल या मोहिमेने जागे झाले. आता मंगळावरही यान पोहोचले असून, तेथील वातावरणाचा अभ्यास केला जात आहे. शिवाजी विद्यापीठातील अवकाशासंबंधीच्या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढता असून, अवकाश संशोधनाच्या अनुषंगाने विद्यार्थी एकेक पाऊल पुढे टाकत आहेत.

आकाशगंगा हा विश्वातील ताऱ्यांचा एक लहानसा संघ. त्याची उत्पत्ती कशी होते, याचे कोडे आजही जगभरातील अवकाश संशोधकांना पडले आहे. अवकाश संरचना पोस्टर प्रदर्शनाच्या माध्यमातून पाहायला मिळणार आहे. 'चांद्रयान मोहीम ३' वेगवेगळ्या टप्प्यात कशी झाली, याची माहिती पोस्टरमधून मिळणार आहे. त्याचबरोबर हॅली धूमकेतू, वेगवेगळ्या प्रकारचे तारे, सूर्याचा जीवनप्रवास, पिलर्स ऑफ क्रिएशनविषयीच्या पोस्टर्सचा समावेश असणार आहे.


## दुर्बीण पाहता येणार


■ पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रात मोठी दुर्बीण आहे. दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये विद्यार्थी येथे अवकाश निरीक्षणाचा आनंद लुटतात. ही दुर्बीण प्रदर्शनात ठेवण्यात येणार आहे. अवकाश निरीक्षणात दुर्बिणीचे महत्त्व अवकाश संशोधक विद्यार्थी सांगणार आहेत.


प्रा. डॉ. राजीव व्हटकर

"'अवकाश : चांद्रयान मोहीम ३' प्रदर्शनात हबल व जेम्सवेब या अंतराळातील अत्याधुनिक दुर्बिणींद्वारे घेतलेली छायाचित्रे वापरून ताऱ्यांच्या निर्मितीपासून कृष्णविवरापर्यंतचा प्रवास पोस्टरच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. इस्रोच्या चांद्रयान मोहीम ३ ची संपूर्ण माहिती प्रदर्शनातून मिळणार आहे. चांद्रयान मोहीम ३ मध्ये २३ ऑगस्ट २०२३ ला चंद्राच्या पृष्ठभागावर विक्रम लँडरने सुरक्षित व सॉफ्ट-लँडिंग पूर्ण केले. यासह भारत चंद्रावर उतरणारा चौथा व चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ उतरणारा पहिला देश बनला. प्रग्यान रोव्हरच्या यशस्वी तैनातीनंतर सॉफ्ट लँडिंग करण्यात आले. लँडिंग साइटला शिवशक्ती पॉइंट असे नाव देण्यात आले आणि २३ ऑगस्ट हा 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून घोषित करण्यात आला. यंदा भारत पहिला राष्ट्रीय अवकाश दिवस साजरा करणार आहे.

- प्रा. डॉ. राजीव व्हटकर
समन्वयक, अवकाश संशोधन केंद्र,
शिवाजी विद्यापीठ








भारतीय अवकाश संशोधन केंद्राचा प्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JUL 2024

सकाळ

# महाविद्यालये, शाळा पुन्हा भरल्या

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : पावसाचा जोर कमी झाल्याने पुराचे पाणी ओसरत असून वाहतुकीचे मार्ग खुले होऊ लागले आहेत. असे मार्ग खुले झालेल्या शहर आणि ग्रामीण भागातील महाविद्यालये आणि प्राथमिक, माध्यमिक शाळा आजपासून पुन्हा भरल्या.

जिल्ह्यात रविवार (ता. २१ जुलै) पासून अतिवृष्टी सुरू झाली. त्यामुळे पूरस्थितीचा अंदाज घेऊन प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू करण्याबाबतची सूचना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने मुख्याध्यापकांना केली. त्यानुसार शिरोळ, चंदगड, करवीर आदी तालुक्यांतील शाळा बंद राहिल्या. मंगळवार ते गुरुवारदरम्यान बंद राहणाऱ्या शाळांची संख्या वाढली. अतिवृष्टी वाढल्याने जिल्हा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव शुक्रवारी आणि शनिवारी सुटी जाहीर केली. करवीर आणि कोल्हापूर शहरात पावसाचा जोर कायम राहिल्याने तसेच पूरग्रस्तांसाठी निवारा केंद्र उभारण्यात आलेल्या शाळांना सोमवारी सुटी देण्यात आली. पावसाने उघडीप दिल्याने पंचगंगा नदीची पाणी पातळी कमी होत आहे. पाणी पातळी कमी झाल्याने परिसरातील आणि वाहतुकीचे मार्ग खुले झालेल्या भागांतील शाळा आजपासून पुन्हा भरल्या. शाळांचा परिसर विद्यार्थ्यांमुळे गजबजून गेला.

**आजपासून विद्यापीठाच्या परीक्षा**

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील पूरस्थितीमुळे शिवाजी विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा २२ जुलैपासून स्थगित केल्या होत्या. या परीक्षा उद्या, बुधवारपासून पूर्ववत सुरू होणार आहेत. विविध २४ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा देखील होणार आहेत.